MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

2018-19

Special Issue February 2019
Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

Special Issue – Vol. II



## VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES & OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT & CHALLENGES.

Guest Editor
Dr.B.K.Shep
Dr.R.D.Rathod
Dr.K.M.Bhange

42) भटक्या 'मरीआईवाला' जमातीतीलस्त्रियांचीसद्यस्थिती
प्रा.जयश्री डंके, निगडी, पुणे ||105

43) आदिम जमातीतील महिलांचा संघर्ष
प्रा. डॉ. एस. ए. टेंगसे, सोनपेठ, जि. परभणी ||107

44) भटके विमुक्त आणि आरक्षण
डॉ. नारायण भोसले, मुंबई विद्यापीठ, मुंबई ||110

45) आदिवासी जीवनाचा ऐतिहासिक आढावा
प्रा. डॉ. अंभुरे एस. डी., सोनपेठ. जि परभणी ||113

46) वासुदेव समाजाचा प्रारंभिक इतिहास
प्रा. डॉ. बी. पी. बोंगार्डे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग ||115

47) महाराष्ट्रातील वारली व भिल्ल या आदिवासी चळवळीचा अभ्यास
प्रा.डॉ.कदम संतोष तुकाराम, म्हसवड ||117

48) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक - जीवन व कार्य
डॉ. एच.टी. सातपुते, पालम जि. परभणी ||120

49) महाराष्ट्रातील विमुक्त—भटक्या जाती, जमाती व जातपंचायतीमधील स्त्रियांची स्थिती
ज्योती प्रकाश गावंडे & डॉ. मधुकर चाटसे, वाळुज, ता. गंगापूर. जि.औरंगाबाद ||122

50) विमुक्त — भटक्या जमात — गोपाळ समाजाची समस्या;
प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार, कुरखेडा जिल्हा — गडचिरोली ||126

51) उमरगा शहरातील मसनजोगी जमातीची सद्यस्थिती : एक समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा.अनिल म्हाळाप्पा गाडेकर, ता.उमरगा जि.उस्मानाबाद ||128

52) महाराष्ट्रातील विमुक्त—भटक्या जमातीची सद्यकालीन स्थिती
जाधव श्रीराम दामला ||130

53) महाराष्ट्रातील विमुक्त-भटक्या जाती-जमाती व इतर मागासवर्गीय स्त्रियांची स्थिती
प्रा.श्रीमती सुनिता जगन्नाथ कुकडे, मानवत ||132

54) हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक—जीवन आणि कार्य
प्रा.डॉ.आर.व्ही.मोरे, रिसोड जि.वाशिम ||136

55) महाराष्ट्रातील भटक्या आणि विमुक्त जमातीची सदय:स्थिती
प्रा. चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे, परभणी ||137

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta® Peer Reviewed International Publication

February 2019
Special Issue-02



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Dist. Parbhani

45

# आदिवासी जीवनाचा ऐतिहासिक आढावा

प्रा. डॉ. भोपुरे एस. डी.
इतिहास विभाग,
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जि परभणी

## १.प्रस्तावना :—

आदिवासी हा शब्द एबोरिजिनल प्रयोग पावलेला भौगोलीक क्षेत्रात राहणाऱ्या ज्यांचा इतीहासा मध्ये जुना संबंध आहे. जे जगात अनेक ठीकाणी वेगवेगळ्या भागात अलग अलग लोक राहु लागले. त्या भागातील सर्वात जुन्या वस्तीला आदिवासी असे म्हटले जावु लागले. उदा. 'इंडीयन' अमेरिकेत आदिवासी म्हटले जाते आणि प्राचीन काळात त्यांना दस्यु, निषाद, आदि, असे म्हटले आहे. आदिवासींना एबोरिजिनल, इंडिजीनस, देशज, मुळनिवासी, जनजाती, वनजाती, जंगली, गीरीजन, बर्बर इत्यादी. आदिवासींना शब्द वापरले आहेत. आदिवासी जिवनाचा ऐतिहासिक आढावा खालील मुद्यातुन आपल्याला सविस्तर पणे दिसुन येते.

## २.आदिवासींची संख्या :—

आज भारतात अनुसुचीत आदिवासींची संख्या ७०० आहे भारतात १९९१ च्या जणगननेनुसार आदिवासी संख्या १,११,११,४९,८ पटकी होती. व २००१ च्या जणगननेनुसार आदिवासी संख्या ८,४३,२६,२४० झाली. देशात ८.२ टक्की आहे. भौगोलीक दृष्ट्या आदिवासी समाज ४ भागात विभागला आहे.

१. उत्तर पुर्वीय क्षेत्र:— यामध्ये हिमालय, ब्रम्हपुत्र, यमुना पुर्वे पहाडी प्रदेशात, गुरुंग, लिंबु, लपचा, आका, डाफला, अबोर, मीरी, मिशमी, सिंगपी, मिकिर, राभ, कचारी, गारो, खासी, नाग, कुकी, लुशाई चकमा इत्यादी.

२. मध्य क्षेत्र:— उत्तर प्रदेश मिर्झापुर जिल्हा दक्षिण भागात राजमहल पर्वत ते दक्षिण गोदावरी पर्वत पर्वत, संथाल, मुंडा, माहली, उराव, भुमीज, बिरहोर, ज्युआंग, खोंड, सवरा, गोंडा, भिल्ल, कोरकु, इत्यादी जाती.

३. पश्चिमी क्षेत्र :— भिल्ल, मीणा, ठाकुर, कटकरी, इत्यादी.

४. दक्षिणी क्षेत्र :— चेंचु, कोटा, रेड्डी, गजवीड, कोया, कोलाम, कोरग, बडागा, टोडा, पाडर, मलायन, उराली. इत्यादी. भागात विभागले आहेत.

## ३.महाराष्ट्रातील आदिवासींचे वास्तव्य :—

२०११ च्या जणगननेनुसार महाराष्ट्रात एकुण ४७ आदिवासी जमाती राहतात. यातील भिल्ल, गोंड, महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकूर. हे एकूण आदिवासींच्या तुलनेत ९३ टक्के आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी संख्या ८.८५ टक्के आहे म्हणजे १ कोटी पाच लाख असुन देशाच्या तुलनेत ५.९ टक्के आदिवासी महाराष्ट्रात राहतात. यातील ९५ लाख आदिवासी फक्त शहरात राहतात. तर ९,० लाख आदिवासी ग्रामीण भागात राहतात. महाराष्ट्रात एकुण १,४ जिल्ह्यात आदिवासी राहतात त्यात गडचीरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नांदेड, नागपुर, गोंदिया, भंडारा, अमरावती, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक ठाणे, रायगड. इत्यादी जिल्ह्यात आदिवासींचे वास्तव्य आहे.

## ४. आदिवासी समाजाचे वैशिष्टे :—

जगातील सर्व भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचे इतर सामान्य समाजापेक्षा त्यांचे स्वतंत्र असे काही वैशिष्टे आहेत ते म्हणजे आदिवासी हे टोळी टोळी ने राहतात. त्यांची स्वतंत्र संस्कृती आहे. आज ब-याच आदिवासी लोकांचे सांस्कृतिक जीवन वेगळे आहे. आदिवासी लोक जुन्या पैतृतिक कबीन गुंतलेले असतात. तसेच आदिवासींची लोकसंख्या कमी असल्या कारणाने ते परिवर्तनवादी नसतात. त्यांच्या रुढी-परंपरा जास्त दिसुन येतात. तसेच ते विशिष्ट भुप्रदेशात राहतात. त्यांची समान बोली असते पण कोणी नाही त्यांच निर्सगावर अवलंबुन जीवन पध्दत आहे. तसेच साधी अर्थव्यवस्था आणि सामाजीक एकजीनसी पणा त्यांच्यात दिसुन येतो. आदिवासी हे अंतर्विवाह असतात. आपण जागतीक आदिवासी समाजाचा अभ्यास केला तर उत्तर, दक्षिण अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, एशिया व द्विप व द्विप समुह येथिल आदिवासींचे अनेक रुप दिसुन येतात.

## ५. आदिवासी स्त्रीजीवन :—

आदिवासी समाज हा डोंगरी भागात राहतो तो आधुनिक जीवनापासुन कोसो दूर राहतो आदिवासी समाजात दारिद्र्य, कुपोषण, अज्ञान, बेरोजगारी, व्यसनाधीनता, अंधश्रधा, पीळवणुक, स्त्रीयांवर अत्याचार होत असत. त्या काळी आदिवासी स्त्रीया म्हणजे जमीनदारांनी खाजगी मालमत्ता समजली जात असे त्यांना उपाशी ठेवणे मारहाण करणे बांधकाम करणे इत्यादी त्रास सहण करावा लागत असे. त्यामुळे आदिवासी स्त्री गुलाम असते स्त्रीला मुल्य देवुन विकत घेतले जाते तिच्याशी पाशिव वर्तन करण्यात येत असे असा एक दृष्टीकोण आहे. असे असले तरी आदिवासींच्या स्त्रीयांना त्यांच्या अर्थात सामाजीक जीवनात स्त्री स्वातंत्र होते. कारण आदिवासी समाजात स्त्रीयांना आपला पती निवडण्याचा अधिकार आहे. याउलट उच्चवर्णीय हिंदु समाजात स्त्रीयांना दुय्यम स्थान आहे. आदिवासी स्त्रीयांना आदिवासी भागात कोणतीही भिती दिसुन येत नाही यावरुन असे दिसुन येते कि सामाजीक जीवनात आदिवासी स्त्रीयांना अधिक प्रमाणात विकास झालेला होता.

आदिवासी समाजात मातृसत्ताक पध्दत आहे. होती त्यामुळे पती कुटुंबात घराई किंवा जावाई म्हणुन असत. पुर्वकालील

आदिवासी समाजात पुरुषांना लग्नानंतर कमीत कमी ५ वर्ष सासऱ्याकडे राहवे लागत असत. मातृसत्ताक आदिवासी जमाती फार कमी आहेत. आस्ट्रेलीया, आफ्रिका येथे काही जमाती तर भारतात खासी, तर अमेरीकेतील इराकवाइट, ज्युब्ली, टुलीनागिट या जमाती मातृसत्ताक आहेत. तसेच आदिवासी स्त्रीयांच्या बाबतीत अनेक रुढी परंपरा दिसुन येतात. उदा. आदिवासी जमातीत मासिक विटाळ बद्दल घृणा असते. त्यांना या काळात वेगळे केले जाते त्यामुळे धार्मीक जीवनात महत्वाचे स्थान दिले जात नाही परंतु आदिवासी स्त्रीयांना प्रगत समाजातील स्त्रीयांच्या तुलनेत अधिक लैंगीक स्वातंत्र असते. वरील सर्व आदिवासी स्त्रीयांची स्थिती व आदिवासी स्त्रीयांचे जीवन दिसुन येते.

## ६. आदिवासी समाजाच्या समस्या :—

आदिवासींची संख्या काही जिल्हयात राहत असले तरी आदिवसींना आपले स्वातंत्र आस्तित्व आहे. सामुहीक जीवन पध्दत, सामुहीक निर्णय, आवश्यक तेवढेच पिकवणे, जंगलाचे रक्षण करणे, अशा बऱ्याच गोष्टी त्यांच्याकडुन शिकण्यासारख्या आहेत परंतु आज आदिवासी समोर फार समस्या आहेत. १. इंग्रजांनी १८६४ ला जंगल संरक्षण कायदा तयार करून आदिवासीवर अनेक बंधने आणली त्यांनी आदिवासींच्या जमीनीवर ताबा मिळवुन आदिवसींची सामुहीक जमीन वैयक्तीक मालकीची केली याचा फायदा सावकार, तंत्राटदार, दलाल यांनी घेतला या कायदयामुळे आदिवासींना आपल्या पारंपारीक हक्कांना मुकावे लागले. २. भारतात आज ४२९१ मोठी धरणे आहेत त्यापैकी ३५५६ पुर्ण बांधलेले आहेत. बाकीच्या धरणाचे काम चालु आहे. या धरणामुळे ६ ते .५ कोटी लोक विस्थापित झाले आहेत यात सगळ्यात मोठा फटका आदिवासींना बसला आहे. तसेच ९० टक्के कोळश्याच्या खाणी ५० टक्के खणीज खाणी आदिवासी पटयात आहेत याशिवाय लाकुड वनस्पती याच भागात आहेत. एकुन विस्थापिता पैकी ५५ टक्के हे आदिवासी आहेत. याचा परिणाम आदिवासी मध्ये १९९३, १९९४ मध्ये ५१.९ टक्के दारिद्र तर २००४—२००५ ला ४.६ टक्के कमी ४७. ३ टक्के आदिवासी दारिद्र आहे हा विस्थापणाचा परीणाम आहे. ३. षेतीच्या अयोग्य नियोजनामुळे आदिवासींना जगन अवगड होवुन बसले त्यामुळे भुकबळी कुपोषण या समस्या निर्माण झाल्या ४. सर्वोच न्यायालयाने अनुच्छद नुसार भारतातील सर्व गरीबांच्या मुलांना प्राथमीक शिक्षण मीळावे शिक्षणापासुन कोणीही वंचीत राहु नये त्यामुळे आदिवासी, भटक्या—विमुक्त, स्थलांतर, उसतोड, बांधकाम मजुर, अपंग, बालकामगार इत्यादी साठी या कायदयानुसार आदिवासी मुलासाठी आश्रम शाळा, वस्तीगृह, शिष्यवृत्या इत्यादी प्रयत्न केले परंतु आज बऱ्याच आश्रम शाळा वस्तीगृह बोगस असल्याने आदिवसींची प्रगती झाली नाही. ५. कुपोषण, बालमृत्यु, साथीचे रोग, इत्यादी अजारांनी विळखा घातलेल्या आदिवासींच्या आरोग्याच्या गरजा पुर्ण करण्यासाठी विध्यमान योजना अपुऱ्या किंवा निरउपयोगी ठरत आहे. सरकार राज्यातील कुपोषण कमी झाल्याचा दावा करीत असले तरी ठाणे, नंदुरबार, नाशिक, गडचीरोली येथे कुपोषण प्रमाण ४२ ते ५२ टक्के वाढले आहे.

## ७. समारोप:—

वरिल सर्व घटकातुन भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी संख्या, त्यांच वास्तव्य, त्यांच सांस्कृतिक जीवन, आदिवसींचे वैशिष्टे व त्यांच्या समस्या दिसुन येतात. यावरून असे लक्षात येते आदिवासी समाज दुर्गम व डोंगरात राहते त्यामुळे शिक्षण तळागाळा पर्यंत पोहचले नाही. आज महाराष्ट्रात ५०० पेक्षा जास्त आदिवासी शाळा आहेत. परंतु तेथे विद्यार्थी नाहीत मुलांना दैनंदिन वस्तु नाहीत किंवा मुलींवर लैंगीक अत्याचार होतो. हे आपल्याला कटु सत्य नाकारता येत नाही तसेच आदिवासी शेतकऱ्यांची पीक आदिवासी महामंडळे नगण्य भावाने खरेदी करतात त्यांच्या हाताला काम नसल्यामुळे शहरात येवुन मोकळ्या जागेत पाल उभारून राहातात. तेथे स्त्रीयांचे लैंगीक शोषण होते. तसेच आदिवासींच्या नावाने खोटे प्रमाणपत्र काढुन दुसरेच लोक नोकऱ्या करतात. त्यामुळे आदिवासी नोकरीपासुन वंचीत राहतो. आज देशात १६० आदिवासी लोक प्रतीनीधी आहेत. परंतु हे सर्व लोक प्रतीनीधी पक्षांच्या दावणीला बांधले आहेत. त्यामुळे आदिवासींचा मनावा तसा विकास झाला नाही.

## ८. संदर्भ :—

१. आदिवसी लेख विकीपीडीया.

२. अंजली कुलकर्णी — आदिवासी स्त्रीयांची स्थीती लेख एप्रील २०१६.

३. २०११ जणगणेनुसार आदिवासींची स्थीती.

४. आदिवासी विषयक माहीती विकीपीडीया.

५. डॉ. गोपाळ गवारे— आदिवासी विकासातील अडथळे.

६. डॉ. श. ना. नवलंगुदकर निवृत उपकुलगुरू पुणे विद्यापिठ.

□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani